(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIV / Issue – I ISSN 2277-8063

# प्रिया तेंडूलकरांच्या कथेतील नायिका चित्रण

**प्रा. डॉ. विठ्ठल नामदेव रोटे** मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव ता. वाळवा , जि. सांगली ईमेल –vnrote@gmail.com

---

**प्रस्तावना-**

प्रामुख्याने १९७५ नंतरच्या स्त्री लिखीत साहित्यावर स्त्रीवादी विचारांचा प्रभाव दिसून येतो. स्वअस्तित्वाची जाणीव, समाजातील तिचे दुय्यमत्व, पुरुषप्रधान संस्कृतीतील तिचे स्थान, लिंगभेदावर आधारीत विषमतेची वागणूक, तिची आत्मनिर्भरता, स्त्री पुरुष नात्यात समानतेची अपेक्षा अशा मुद्द्यावर स्त्रीवादी विचारसरणी अवलंबून आहे. निसर्ग, माणूस, समाज, धर्म, संस्कृती, शासन, अर्थ संकल्पनांमध्ये जशी क्रांति झाली. तसाच 'स्त्री' या अंगाचाही विचार होणे महत्वाचे होते. यातूनच स्त्री आत्मभानाची जाणीव झाली. प्रस्थापित समाज चौकटीचे स्वरूप आणि त्यामध्ये स्त्रीचा निर्माण झालेला अवकाश यासंबंधी 'स्व' या नव्या जाणिवेतून जेव्हा स्त्रीचा विचार करू लागली तेंव्हा स्त्रीवाद निर्माण झाला. सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक क्षेत्रामध्ये स्त्रीचे स्थान दुय्यम ठेवण्यात आले. तिच्या कोणत्याच कला कौशल्याला, बुध्दीमतेला अवकाश नव्हता. परंपरागत विचारांचा पगडा तिच्यावर ठेवण्यात आला. तिचे अस्तित्व फक्त शरीर मर्यादेपर्यंत ठेवण्यात आले. पुरुषाच्या जगात पुरुषासाठी वापरण्यात आलेली वस्तू एवढेच तिचे स्थान होते. "रूढ समाज व्यवस्थेतील धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, बौध्दिक भाषिक अशा सर्वच व्यवस्था स्त्रीचे शोषण करतात. हे शोषण अतिशय पध्दतशीरपणे करण्यात येते. खुद्द स्वतः स्त्रीलाही आपले शोषण होत आहे हेच मुळात लक्षात येत नाही. अशा पध्दतीने हे शोषण चालू असते. हया शोषणाचे परिणाम मात्र स्त्रीवर व्हायच तसे होतातच. तेंव्हा हया शोषणव्यवस्थेवरचा बुरखा फाडून टाकून तिचे मुळ रूप उघड करण्याचा स्त्रीवाद संकल्प करतो."[१] याच भूमिकेतून १९७५ नंतरच्या काही लेखिका लेखन करताना दिसतात. स्त्रीच्या 'स्त्री' म्हणून येणाऱ्या वेदना बाजूला सारून, पुरुषी वृत्तीतून बाजूला होऊन, पुरुषाच्या स्वामित्व भूमिकेला फाटा देऊन या लेखिका लेखन करतात.

१९९० नंतरच्या काही कथालेखिका 'स्त्रीवाद' डोळ्यासमोर ठेऊन कथालेखन करताना दिसतात. प्रामुख्याने या लेखिका शहरी वातावरणात असल्याने शहरी मध्यमवर्गीय व पांढरपेक्षा वर्गातील स्त्री स्वतंत्र विचाराने कशी जगते हे त्या प्रत्यक्ष अनुभवतात. त्यामुळे त्यांच्या कथेत येणारी नायिका पुरुषी वृत्तीला विरोध करणारी, पारंपरिक चौकट उध्वस्त करणारी, स्वतःला हवे ते करणारी, पतीच्या दबावाला न जुमानता स्वतंत्रपणे जगणारी आहे. अशा नायिकांचे चित्रण १९९० नंतरच्या काळात प्रिया तेंडुलकर यांनी आपल्या कथेत केले आहे.

**प्रिया तेंडुलकर यांच्या कथेतील नायिका चित्रण -**

प्रिया तेंडुलकरांच्या कथेत स्वतंत्र अस्तित्व शोधणाऱ्या स्त्रियांचे चित्रण येते. "प्रिया तेंडूलकरांची कथा सर्वार्थाने स्त्री जन्मांची कहाणी सांगणारी आहे. पारंपरिक वंश सातत्याच्या संकल्पनेतला 'स्त्री' चा वंश आणि एकूणच मानवी भेदाभेदामध्ये सार्वत्रिक पातळीवर वेगळा उठून दिसणारा 'स्त्री' चा वंश कथेचा केंद्रबिन्दू ठरतो."[२] प्रियांच्या कथेत मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय, पांढरपेशा, सुशिक्षित वर्गातील स्त्रिया येतात. प्रिया तेंडुलकरांच्या 'वारे' या कथेतील रेणूका पाटील साताऱ्याच्या खेडेगावातून एम.ए. शिक्षण घेऊन मुंबईला नोकरी निमित्त येते. तिच्याच गावातील प्रभाकर बाईतच्या फर्ममध्ये काम करते. अविवाहीत रेणूका प्रभाकर बरोबर पार्टीला जाते. त्याच्याबरोबर फिरते, अगदी शरीरसंबंधही ठेवते. चारचौघीसारखे आपण उठून दिसावे, स्वतःचा उदयोगधंदा सुरू करावा अशी स्वप्ने पाहणाऱ्या रेणूकाला आपल्या नावातच श्रीमंती वाटते. पण प्रभाकर तिला तिच्या वागण्याबोलण्यातील उणीवा दाखवितो. तरीही प्रभाकर तिला आवडतो. त्याच्यातील कर्तृत्ववान पुरूष तिला आवडतो. आई वडिलांच्या विरोधाला न जुमानता आपले अस्तित्व शोधण्यासाठी आपण मुंबईत आलो. आपणही काही तरी करू शकतो असा तिच्यात आत्मविश्वास निर्माण होतो व ती प्रभाकर बाईतला नकार देते. स्वतःतील आत्मभान, आत्मविश्वास व स्त्रीपणाची जाणीव झालेली रेणूका प्रिया तेंडुलकर या कथेत चित्रीत करतात.

'भाजीपाला' या कथेत राधा या स्त्रीचे चित्रण येते. राधा व देव गोखले पती पत्नी आहेत. पण देवच्या आवडी निवडी, त्याने घेतलेले निर्णय राधाला आवडत नाहीत. मुलांना जन्म दयावा, घराची जबाबदारी फक्त राधानेच घ्यावी असे देवला वाटते. पण राधाला मात्र हे आवडत नाही. तिला स्वतंत्र जगायचे आहे. त्यामुळे ती देवच्या विरोधात जाऊन नोकरी पत्करते. आपल्यापेक्षा दहा वर्षानी लहान निरादवर प्रेम व त्याच्याशी संबंध ठेवते. निराद तिच्याशी लग्न करण्याचा निर्णय घेतो. पण राधा विरोध करते व म्हणते, "एका तरण्याबांड मुलाला वेड लावू शकते ती बाई नवऱ्याला का हवीशी वाटू शकत नाही? सतत वाटत होते की देव पुन्हा माझ्यात पूर्वी इतका नाही तरी थोडा फार जवळ येईल. हात लांब केला तर स्पर्श करता येईल इतका,"[३] आपण जे करतो आहोत ते चुकीचे आहे. याची जाणीव होऊन देवाला आपण नोकरी सोडणार असल्याचे सांगते. एकूणच पतीपत्नीचे सुख कशात आहे याची जाणीव झालेली व स्वतःचे अस्तित्व शोधणाऱ्या राधाचे चित्रण प्रिया तेंडुलकर करतात.

प्रिया तेंडुलकरांच्या 'तुकडे' कथेतील नायिका अविवाहीत आहे. घरची जबाबदारी तिच्यावरच आहे. त्यामुळे लग्न करीत नाही. तिशी ओलांडलेल्या नायिकेच्या लग्नाचा विचार तिच्या घरचे करीत नाहीत. त्यामुळे नायिका स्वतःच आपले लग्न

ठरवते पण नियोजित नवरा मात्र चित्रकार असूनही तो तिच्याच पैशावर चैन करतो. उलट तिच्याशी लग्नाअगोदरच संबंध ठेवतो. नायिकेच्या भावाला नोकरी लागते. तो आपले ठरवितो. आई वडीलही येणाऱ्या नव्या सुनेच्या लाडात गुंतलेले आहेत. अशावेळी नायिका हतबल होते. तरीही आपण स्वतंत्रपणे जगू शकतो असा विश्वास असणारी तेंडुलकरांच्या या कथेतील नायिका नोकरी करून स्वतःच्या पायावर उभी राहणारी आहे.

प्रिया तेंडुलकरांच्या 'लेजर' कथेची नायिका सविता शहाणे आपल्या पतीपासून वेगळं राहते व स्वतःचा बिझनेस सांभाळते. स्वतःच्या हिमतीवर कर्तबगारीवर ती यशस्वी बिझनेस वुमेन होते. 'घसरण' या कथेतील नायिकेला स्वतंत्र व मुक्तपणे जगायचे आहे. तिने सुनिल चटोपाध्याय बरोबर लग्न केले आहे. पण मुलं बाळं, संसार, चुल यातच तिला रहायच नाही. लग्नानंतर लगेच मुलांना जन्म देऊन आपले स्वातंत्र्य हिरावून बसायचे नाही. तिला फिरायचे आहे. जीवनाचा आनंद लुटायचा आहे. आपल्या पगारावर आपला हक्क का असू नये असा तिला प्रश्न पडतो. आपल्या नवऱ्याबरोबर ती आपल्या हक्कासाठी भांडते. शेवटी सुनिलकडे ती घटस्फोट मागते. संसारातून, नातेसंबंधातून तिला मुक्त व्हायचं आहे. एकूणच स्वतःच्या हक्काची, स्वातंत्र्याची जाणीव झालेली नायिका प्रिया तेंडुलकर चित्रीत करतात.

प्रिया तेंडुलकरांच्या 'बायको' या कथेतील नंदिनी देशमुख दुरदर्शनवर निवेदक आहे. तिचा नवरा सुधीर कारकूनाची नोकरी करतो. दोघांचे स्वभाव वेगळे आहेत. नंदिनी आण्णासाहेब प्रधानांची मोठ्या राजकारणी व्यक्तीची मुलगी आहे. तरीही सुधीरबरोबर लग्न करते. नंदिनी यशस्वी निवेदिका आहे पण सुधीरच्या पुरुषी वृत्तीमुळे तिला त्याची सेवा करावी लागते. दारूचे ग्लास भरून देणे, पाय चेपून देणे इ. कामे करावी लागतात. नवऱ्याच्या अशा वागण्याला कंटाळून नंदिनी त्याला सोडून जाते. चांगली पत्नी म्हणून रहात असतानाही सुधीर तिच्याशी वाईट वागतो. आपण हुशार आहोत. चांगली निवेदिका आहोत. त्यामुळे आपण स्वतंत्र राहू शकतो. हा आत्मविश्वास तिच्यात निर्माण होतो. ती सुधीरला सोडून जाते.

प्रिया तेंडुलकरांच्या 'आई नावाची बाई' या कथेतील चंद्रकांता पाटील नवऱ्यापासून दूर राहणारी, स्वतंत्र व कर्तबगार स्त्री आहे. पती तत्वज्ञानाचा प्राध्यापक असूनही चंद्रकांता बरोबर त्याने जमवून घेतले नाही. त्यांच्या वडिलांचा राग चंद्रकांतावर काढला. त्यामुळे चंद्रकांताबाई स्वतंत्र राहून स्वतःचा व्यवसाय सुरू करतात. अडचणीत असणाऱ्या स्त्रीयांना त्या काम लावतात. जानकी आगास्कर सारख्या बाईला नवऱ्याने टाकल्यावर मुलाला जन्म दयायला लावून तिला तिचे पालन पोषण करतात. स्वताच्या पायावर स्वतंत्रपणे राहणाऱ्या चंद्रकांताबाईचे चित्रण प्रिया तेंडुलकर करतात.

'ठकूबाई जळगाववाले' या प्रिया तेंडुलकरांच्या कथेतील अनु अमेरिकेतील परमजीत बरोबर प्रेमविवाह करते. पण परमजीत पंजाबी आहे. तो खानदानी असल्याने घरचे रितीरिवाज पाळतो. त्याचे खानदान मुळातच पुरुष प्रधान संस्कृतीतील असल्याने तोही तसाच वागतो. अनुला तो एक स्त्री म्हणूनच वागवितो. अनुला घरातील सर्व कामे करावी लागतात. डॉक्टर असल्याने हॉस्पीटलमध्ये जावे लागते पुन्हा घरातील कामे व नंतर रात्री परमजीतचा शरीराबरोबरचा आक्रमकपणा सोसावा लागतो. त्यात तिच्या मनाचा विचार नसतो. म्हणून अनू परमजितला न सांगताच भारतात परत येते. आपल्या जुन्या मित्राला ज्याला लग्नाला नकार दिलेला असतो त्या डॉ. विनोदकडे येऊन राहते. त्याच्याशी एक रात्र काढते त्याच्याबरोबरच रहावे असे वाटते, पण विनोद मात्र तसे करत नाही. स्व-अस्तित्वाची जाणीव झालेली अनू प्रिया तेंडूलकर चित्रीत करतात.

**समारोप** -

एकूणच प्रिया तेंडुलकर यांच्या वारे, भाजीपाला, तुकडे, फर्टिलिटी क्लिनिक, लेजर, घसरण, बायको, आई नावाची बाई, ठकूबाई जळगाववाले या कथातून स्व-अस्मितेची जाणीव झालेली, स्वतंत्र विचारांची, आर्थिक व मानसिक दृष्टया प्रगल्भ अशा नायिकांचे चित्रण आले आहे. या नायिका आपल्याला आलेल्या भोगाचे, दुःखाचे, अन्यायाचे रूपांतर सुखात, आनंदात करतात व वेगळया आनंदी जीवन जगण्याचा, सर्व सुख उपभोगायचा प्रयत्न करताना दिसतात.

**संदर्भ** –

१ . नाईक शोभा, भारतीय संदर्भातून स्त्रीवाद स्त्रीवादी समीक्षा आणि उपयोजन, लोकवाड्मय गृह, मुंबई, प्रथमावृत्ती, जून २००७, पृष्ठ ०८

२ . राजापुरे तापस, पुष्पलता (संपा.) १९८० नंतरचे स्त्री निर्मित कथनपर साहित्य, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती, डिसेंबर २०१०, पृष्ठ ७९.

३ . तेंडूलकर, प्रिया, जन्मलेल्या प्रत्येकाला, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००१, पृष्ठ ४८.